# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:-०४/०९/२०१६

१) क्षुल्लक कारणा वरून काठीने मारहान करून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक 23/08/2016 रोजी 06.00 वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे सख्ये भाऊ असुन त्याचे घरा शेजारी आहे. यातील आरोपीच्या शेळ्या फिर्यादीच्या घरी जात असल्याने फिर्यादीने शेळीला काठी मारली म्हणुन आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन पावडयाच्या मुंदईने पाठीवर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन पुढे पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीची नोंद घेवुन वैद्यकीय तपासनी करीता पाठविण्यात आले असता फिर्यादीला सा.रु.भंडारा येथे एक्सरे रिपोर्ट करीता रेफर करण्यात आले होते की दि. 02/09/2016 ला एक्सरे रिपोर्ट प्राप्त होवुन त्यामध्ये छातीची डावीकडील 7 क.ची रिडचा हाड फॅक्चर असल्याचे अभिप्राय प्राप्त झाल्याने फिर्यादी कैलास नत्थु पडारे वय 45 वर्ष रा. जैतपुर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम 325,504,506 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

२) जागेच्या वादावरून भांडण केले व मारण्याची धमकी दिली. :-

दिनांक 02/09/2016 रोजी 20.30 वा. दर. यातील फियादी व आरोपी यांचे घराचे खाली जागेबाबत कोर्टात केस चालु असुन यातील आरोपी हा फिर्यादीचे घराचे छपरीत प्रवेश करुन फिर्यादीचे पतीस तुझी जागा कीती आहे ती घे असे बोलुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुम्ही शेतावर या तुम्हाला तलवारीने कापतो अशी धमकी दिल्याने फिर्यादी सौ. जता टेकराम घोरमारे वय 54 वर्ष रा. कुंभली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम 448,294,506 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

३) मोटार सायकलने मोटार सायकलला धडाक दिल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक 03/09/2016 रोजी 08.30 वा. दर. यातील फिर्यादी ही मोटार सायकल क. एमएच 35 एच 7691 नी मागे बसुन पतीसह धर्मापुरी ते वडद मार्गा नी जात असतांना विरुध्द दिशेने येणा-या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील स्कुटी भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन जखमीचे मोटार सायकल ला धडक मारुन फिर्यादीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम 279,337 भांदवि. सहकलम 184 मोवाका. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

४) <u>संगनमत करून भांडण व मारहान करून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–</u>

दिनांक 02/09/2016 रोजी 21.30 वा. दर. यातील फिर्यादीचे भाचीने अंगणातील बाल्टीमधील पाणी खाली टाकल्याने ते पाणी आरोपीच्या अंगणात गेले या कारणा वरुन आरोपीने शिवीगाळ केला. फिर्यादीने आरोपीस कशाला शिवीगाळ करता असे हटकले असता आरोपीतांनी संगनमत व भांडण करुन फिर्यादीस आरोपी क्र. 2 ने काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी संजय वसंता निमकर वय 31 वर्ष रा. जाम यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम 324,504,34 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

५) <u>एमएसीएल कंपनीचा ठेवलेल्या सामानाची चोरी. :–</u>

दिनांक 31/08/2016 रोजी 17.00 वा. ते 01/09/2016 रोजी 06.00 वा. दर. यातील एमएसीएल कंपनीचा ठेवलेला हॅस्टींग प्लॅग 1 नग कि. 3000/–रु, एनक्यु ड्रिल रॉड 3 नग कि. 7500/–रु, एचएक्स केसींग 1 नग कि. 4000/–रु, एचएक्स शार्टपीन 3 नग कि. 3000/–रु, पंचनग हेड 1 नग कि. 2000/–रु. असा एकुण 20,000/–रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी परवेज आलम हीनायु बेग वय 46 वर्ष रा. खनीज निकेतन अमरावती रोड नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम 379 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

६) <u>अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–</u>

दिनांक ०४/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, साकोली व अडयाळ येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०९ लिटर हातभंट्टी दारु कि. ६५०/–रू. व देशी दारू ०३ लिटर २४० मिली देशी दारू कि. ९००/–रु. तसेच जुगारातुन ५,०७०/–रू. असा एकुण कि. ६,६२०/–रू. चा माल जप्त करण्यात आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.